# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/12/2021 (बुधवार)

---

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक 14/12/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात ऑपरेशन ऑल आऊट मोहीम राबवीत असतांना त्यांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली की, शिवाजी नगर कन्हान येथील शाहरुख खान नावाचा इसम आपले ताब्यात देशी बनावटीचे लोखंडी माऊझर बाळगून आहे. अशी माहिती प्राप्त झाल्या वरून त्याची व त्याचे घराची झडती घेतली असता घर झडती मध्ये एक देशी बनावटीची माऊझर किमती 40000/–रु. मिळून आले. आरोपी नामे– शाहरूख खान वल्द फिरोज खान वय 29 वर्ष रा. शिवाजी नगर कन्हान याचे विरुद्ध कलम 3, 25 भा ह का प्रमाणे कार्यवाही केली. पुढील तपास कामी मुद्देमाल व आरोपींस पोलीस स्टेशन कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. सपोनी अमित अत्राम मो.नं. 9405194317 हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे नेतृत्वात स.पो.नी. अनिल राऊत, पो.हवा. विनोद काळे, ज्ञानेश्वर राऊत, अरविंद भगत, पोलीस नाईक शैलेश यादव, पो.शी.वीरेंद्र नरड, चासफौ साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.



मुद्देमाल व अटक आरोपीसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक

## घरफोडी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील टेकाडी खोरे ले आउट प्लॉट नं. 12 कन्हान येथे दिनांक दि. 10/12/2021 चे सकाळी 06.00 ते दि 14/12/2021 चे सकाळी 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राहुल राजकुमार सिंग वय 26 वर्ष रा. टेकाडी खोरे ले आउट प्लॉट नं. 12 कन्हान यांचे राहते घरी समोरचे दाराचे अज्ञात आरोपीने कडी कापुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने 19.21 तोळे सोनेचे दागीने एकुण कि. 4,80,000/–रू. व 1257 ग्राम चांदीचे दागीने किं. 38,000/–रू., नगदी 65,000/–रू. व टायटन कंपनीची घडी कि. 5000/–रू. असा एकुण 5,88,000/–रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 454, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी अमितकुमार आत्राम मो. क्र 9922388805 हे करीत आहे.

2) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 07 कि.मी. अंतरावरील मौजा खुरजगाव येथे दिनांक 13/12/21 चे 23.00 वा. ते दिनांक 14/12/21 चे 04.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग.भा. मिराबाई गणेश आवारी वय 44 वर्ष रा. वार्ड क्र.03 खुरजगाव यांचे घरात अज्ञात आरोपीने अनधितकृतपणे प्रवेश करून घरातील लोखंडी आलमारीचा पल्ला तोडुन 15,000/–रू. चोरून नेले. तसेच अज्ञात आरोपीने एल.सी.डी.टी.व्ही. व ब्लॅकेट घराच्या भिंतीवर ठेवलेले चोरी करण्याचे उद्देशाने तसेच घराशेजारी भैयाजी शंकर देशमुख यांचा किराणा दुकाणाचा ताला तोडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 511 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अमर झिने मो.न. 8180975125 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील पिवळा शिवार येथे दिनांक 14/12/2021 चे 15.53 वा. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय बुटीबोरीचे फिर्यादी पोलिस नाईक किशोर सरमाखे हे शासकीय कामाने पिवळा शिवार येथे जात होते. दरम्यान एमच–40/एके–6216 क्रमांकाचा टिप्परचा चालकाला पिवळा शिवार येथे थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक आरोपी क्र. 1) प्रणय नरेश मुनघाटे वय 22 वर्षे रा. कावरापेठ उमरेड जि. नागपुर (टिपर चालक), 2) रंजित खुशाल धनविजय रा. करांडला ता. उमरेड जि. नागपुर(टिपर चालक), 3) स्टॅनली विटकी रा कावरापेठ त उमरेड जि नागपुर, (टिपर मालक) व 4) अमोल जांभुळकर (टिपर मालक) यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 30,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 10,30,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक किशोर सरमाखे, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय बुटीबोरी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 व 2 ला अटक आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजय चौधरी मो.क्र. 9823186686 हे करीत आहे.

<u>जबरी संभोग</u>

1) पो.स्टे. मौदा :– दिनांक 10/09/2021 चे 10.12 वा. चे सुमारास आरोपी नामे– आरोपी क्र 2. मयुर शंकर उके वय 23 वर्ष, रा. मौदा याने आरोपी क्र. 1. विजय देवाजी जुमडे, वय 23 वर्ष, रा. धानला, ता. मौदा यास अल्पवयीन पीडीत वय 16 वर्ष हिचे सोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध करण्यास प्रोत्साहीत केले. त्यावरून आरोपी क्र 1 याने अल्पवयीन पीडित सोबत हीचे ईच्छेविरूद्ध 2 वेळा जबरदस्तीने शारीरिक संबंध केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एन) भादंवि. सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच सहकलम अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. 1989. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी कन्हान विभाग श्री मुख्तार बागवान हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– दिनांक 10/07/2013 ते दिनांक 26/11/2021 चे सुमारास आरोपी नामे– विक्की जानकीप्रसाद यादव, वय 30 वर्ष, रा. कपिलनगर चौक नागपूर याने फिर्यादी/पीडिता वय 30 वर्ष हिला लग्नाचे आमिष दाखवुन तिच्यासोबत वारंवार वेगवेगळया ठिकानी शारीरिक संबंध केले. त्यामुळे फिर्यादीला प्रेग्नेट करुन फिर्यादीचा गर्भपात केला. अशा पोस्टे सिताबर्डी नागपूर शहर येथून अप क्र. 580/21 कलम 376(2) (छ), 313 भादवी अन्वेय गुन्हा दाखल होवून ऑनलाईन सीसीटीएनएस व्दारे पोस्टे. रामटेक ला प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 313, 376 (2)(एन) भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि सिमा बेंद्रे मो.नं. 9822973154 या करीत आहे.

<u>विनयभंग</u>

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 13/12/2021 चे 20.00 वा. दरम्यान आरोपी नामे– मनोज मारोतराव कावळे वय 45 वर्ष रा. पाटणसावंगी ता. सावनेर याने वय 16 वर्ष अल्पवयीन फिर्यादी/पीडित हिची तब्येत बरी करण्याच्या उद्येशाने पीडितचे घरी जाऊन, घरातील माणसांना बाहेर जाण्यास सांगीतले. यानंतर आरोपीने पीडित हिला हळद–कुंकू लावून, लिंबू कापून त्यावर हळद–कुंकू कापूर लावून, लिंबू पीडितचे अंगावरून उतरवून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने झालेला प्रकार कोणालाही सांगू नये, याकरिता पीडित हिला धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354,354(1) भादंवी. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच कलम नरबळी आणि इतर अमानूष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोना याना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम 2013 कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पो.नि मारूती मुळुक मो क्र 9552564047 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर